''पुणे जिल्हयातील महिला पोलिस शिपाई कर्मचाऱ्यांच्या समस्या एक समाजशास्त्रीय अभ्यास''

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, मानव्य

विद्याशाखेत पीएच.डी (समाजशास्त्र) पदवीसाठी सादर

करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

सुमेध सुभाषराव राजुरकर

(एम.ए. समाजशास्त्र, सेट)

ता. उमरगा जि. उस्मानाबाद.

मो. नंबर 9405603240

Email – sumedharajurkar@gmail.co

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शाहिनाथ प्रभु घायाळ

(पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग प्रमुख)

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद,

ता. अहमदपूर जि. लातूर.

मो. नंबर 9420873410

Email – dr.ghyl45@gmail.com

एप्रिल 2019

प्रस्तावना –

भारतासारख्या प्राचीन देशा मध्ये कुटुंब संस्थेची पाळेमुळे खोलवर गेलेली आहेत. पूर्वी कुटूंबातील घटकांच्या कामांची विभागणी करण्यात आलेली होती. त्या मध्ये प्रामुख्याने घरा बाहेरील कामे पुरूषांनी करवीत असा संकेत होता तर घर, स्वयंपाक व घर व मुले सांभळण्याची जबाबदारी स्त्रीयांवर सोपवण्यात आलेली होती. मुलांवर संस्कार करण्याचा आणि त्यांचे सगोपण करूण त्यांना वाढवण्याच्या कामाचाही समावेश स्त्रीयांच्या जबाबदारीत होता. वर्षानुवर्षे चालत आलेली ही कुटुंब–संस्था, अद्यापही फारशी बदललेली नाही. तथापी आता कुटुंब संस्थेमध्ये स्त्री व पुरूषांच्या पूर्वापार चालत आलेल्या कामाच्या पद्धतीमध्ये हळूहळू बदल होत आहेत. स्त्रिया आता घराची लक्ष्मणरेषा ओलांडून बाहेर पडू लागल्या आहेत. अर्थाजन हे त्यांचे प्रमुख कारण असले तरी आता स्त्री स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. स्त्रीयांच्या या विचार सरणीमधून जे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत त्यापैकी काही प्रश्नांचा उहापोह करण्याचा हा प्रयत्न आहे.

एकंदरीत सर्वच नोकरदार महिलांच्या आयुष्यात 'समस्या' आहेतच, त्यांच स्वरूप साधारणतः एकच असले तरी महिला पोलिस ही जरा अधिकच चाकोरी बाहेरची, महिलेच्या परंपरागत भूमिकेशी पूर्णतः विसंगत, गुन्हेगारी जगताशी संबंधीत असल्यामुळे त्यांना नवनविन समस्यांना तोंड दयावे लागते. या दृष्टीकोणातून या शोधनिबंधाची कल्पना उदयास आली.

पौराणिक कालखंड या कालखंडात स्त्रियांना सन्मानाने वागवले जात असे. गुरूकुलात शिकणारे विद्यार्थी गुरूपत्नीस मान देत. ख्रिस्तपूर्व 321– चंद्रगुप्त मौर्याचा कालावधी कंलिग देशात चद्रगुप्त मौर्याने आपली राजवट निर्माण केली त्यावेळी राज्य चालवण्यासाठी अनेक निती नियमांची योजना करण्यात आली. चंद्रगुप्ताच्या दरबारात कौटिल्य उर्फ चाणक्य निती आदर्श मानली जात होती. या काळात स्त्रियांना सर्व क्षेत्रात समान अधिकार होता. सामजविघातक शक्तींचा उल्लेख कैटिल्य 'कंटक' असा करतो. पोलिस किंवा हेर ही संकल्पना तेव्हा ही अस्तित्वात होती.

वैदीक काळात स्त्रियांचे स्थान सन्मानाचे व पुरूषांच्या बरोबरीचे होते त्याचे उदाहरण म्हणजे गोषा, गार्गी, मैत्रेयी, थोर स्त्रिया तत्कालीन स्वतंत्र स्त्री वर्गाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात.

स्मृती काळ या काळात मात्र स्त्रियांचे स्थान फारच खालच्या पातळीवर आणून ठेवलेले दिसते. मनूस्मृती मध्ये जी जातीव्यवस्था ठरवण्यात आलेली होती ती प्रामुख्याने जन्मावर आधारीत होती त्यामुळे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र यांची कामे जन्मानुसार ठरत असत. याच काळात स्त्रियांना सुद्धा मनुने शुद्रच मानले होते.

मध्ययुगीन काळात भारतात पोलीस यंत्रणा दिल्लीत प्रथम सुलतानशाही आणि पुढे मोगलशाही आल्यावर परंपरागत पोलीस व्यवस्थेत काही फेरफार झाले. जमीनदार स्वतःही छोटी दले पदरी बाळगून न्यायदान आणि ग्रामीण पोलिसांवर देखरेख ही कामे करू लागले. भरीला फौजदारी पद्धतही सुरू करून प्रत्येक प्रांताचे (सुभा) उपविभाग (सरकार) पाडण्यात आले. प्रत्येक सरकारवर एक फौजदार–सेनाधिकारी यांच्या हाताखाली 500 ते 1500 रक्षकांचे दल नेमले जाई. फौजदार व ठाणेदार या दलाच्या मदतीने रस्त्यांवर पहारा करून वाहतुकीची व्यवस्था पाहणे, राजस्व अधिकार्यांना करवसुलीत सहाय्य करणे, इ. कामे पार पाडू लागले. शहरात नागरिकांच्या जागी नवे कोतवाल नेमून त्यांच्याकडे काही नवीन कामेही देण्यात आली. उदा. परगावच्या प्रवाशांसाठी सराया (धर्मशाळा) बांधणे, सर्व थरांतील लोकांच्या जमाखर्चाची नोंद ठेवणे, वस्तूच्या किंमती शक्य तो खालच्या पातळीवर रोखणे, खाटिकखाने तसेच खाटिक, ढोर, भंगी, शिकारी इत्यादींसाठी वेगळ्या वसाहती निर्माण करून देणे, रात्री प्रत्येक शहरात संचारबंदी लागू करणे इत्यादी. रात्रीच्या संचारबंदीची प्राचीन प्रथा कित्येक वर्षे चालू होती. कंपनी सरकारने मात्र ती रद्द करून टाकली.

पोर्तुगीज सत्तेखालील गोव्यासारख्या विभागात चोरी झालेली असता ती शोधता न आल्यास कोतवाल, फौजदार, ठाणेदार, पाटील आणि पोलीस कामगार यांना नुकसान भरपाई करून द्यावी लागे. अशाच प्रकारची पोलीसयंत्रणा पुढेही विजयनगर राज्यात तसेच महाराष्ट्रातही चालू राहिली. महाराष्ट्रात खेडेगावातील करवसुलीचे आणि शांतता व सुव्यवस्था टिकविण्याचे दायित्व वतनदार पाटील पोलीसप्रमुख आणि व त्यांच्या हाताखालील महार, रामोशी, मांग, भिल्ल, जागले यांच्याकडे असे. येथे जमीनदारी पद्धत अस्तित्वात नसल्याने तालुक्याच्या मामलेदारांकडे गावकामगार व पाटील यांच्या कामावर देखरेख ठेवण्याचे अधिकार असत. त्या कामासाठी खास कर बसविण्यांचाही त्यांना अधिकार असे.

पुण्यात वस्तूंच्या किंमती रोज निश्चित करून त्यांची यादी पेशव्यांकडे पाठवणे, शनिवार वाड्यावरील कामासाठी मजूर व कारागीर पुरविणे इ. कामेही थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीत (1761 ते 1772) कोतवालाकडेच असत. रात्रीची संचारबंदी अधिक कडक झाली. यांसंबधीच्या नियमांत कोणताही अपवाद केला जात नसे. जेथे शासनयंत्रणा प्रबळ होती निरीक्षणाची व्यवस्था कार्यक्षम असेल, तेथे ही प्राचीन भारतीय पोलीसयंत्रणा आदर्श ठरे. प्रतीहार, पाल, पांड्य आणि पेशवे यांच्या राज्यातील पोलीस यंत्रणेची स्तुती खुद मौंट स्ट्यूअर्ट एल्फिन्स्टनसह अनेक विदेशी लेखकांनी केलेली आढळते. मोगल साम्राज्य मोडकळीस आल्यावर मात्र पोलीसयंत्रणाही ढासळू लागली आणि रक्षकच भक्षक बनले. मध्य व उत्तर भारतात पेंढारी व ठग यांचा धुमाकूळ सुरू झाला. अशा स्थितीत नुकसानभरपाई देणार कोण आणि कुणाला? आधीच डबघाईला आलेली

ही यंत्रणा अधिकृतपणे रद्द करण्याचे काम कंपनी सरकाने पार पाडले. ती आधीच मृतप्राय झालेली असल्याने ती बंद करण्यात तिच्या लोकप्रियतेला ओहोटी लागण्याचा धोका मुळीच नव्हता.

1858 इंग्रजी अंमलातील पोलीसयंत्रणा कायदा व सुव्यवस्था शासनाने स्वतःच्याच हाती घेतल्याचे उदाहरण पाश्चात्त्य राष्ट्रांत मात्र आढळत नाहीय पण भारतात नगरपालिकांसारख्या स्वायत्त संस्था नसल्याने कंपनी सरकाने विभिन्न राज्यांत पोलीसयंत्रणा उभारतांना नानाविध प्रयोग करून पाहिले. हे प्रयोग 1668 पासून 1861 पर्यंत म्हणजे दोन शतके सुरूच होते. 1668 साली मुंबई बेट कंपनीच्या ताब्यात आल्यावर रात्रीच्या गस्तीसाठी एक अनधिकृत दल उभारले. त्यासाठी प्रत्येक कुटुंबातून एकेक व्यक्ती पाठविण्याची सक्ती करण्यात आली. प्रत्यक्ष गुन्ह्यांवर या दलाचा फारसा परिणाम झाला नाही पण ही प्रथा शंभर वर्षे तशीच सुरू होती. 1771 साली मात्र 48 अधिकारी व त्यांच्या हाताखाली 400 पगारी पोलीस मिळून एक नवे दल उभारण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय पोलीसयंत्रणेत खूपच सुधारणा झाल्या. सर्व राज्यांतील अधिकाऱ्यांचे गणवेश आता समान ठेवले आहेत. गुन्ह्यांच्या आणि इतरही कोष्टकांत एकसूत्रीपण आला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आणि गुप्तचर विभागातील अधिकार्यांच्या प्रशिक्षणासाठी मौंट अबू व कलकत्ता येथे संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. पूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका प्रत्येक राज्य स्वतंत्रपणे करीत असे. पण आता अखिल भारतीय पोलीस सेवेसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेऊन उत्तीर्ण झालेले अधिकारीच सर्व राज्यांत वाटून देण्यात येतात. गुन्ह्यांच्या तपासात विज्ञानचे साहाय्य मिळविण्याच्या दृष्टीचे शास्त्रीय प्रयोगशाळाही स्थापन झालेल्या आहेत.

1911 ते 1915 स्त्री–पोलीस ही स्वातंर्त्योत्तर काळातील एक महत्त्वाची तरतूद होय. मुंबई, पुणे, नागपूर या शहरात, रेल्वे पोलीस खात्यात व बहुतेक सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी स्त्री–पोलीस नेमलेले आहेत. समाज कल्याणाच्या हेतूने केलेल्या बॉम्बे चिल्ड्रेन ॲक्ट यांसारख्या कायद्यांच्या अंमल बजावणीसाठी स्त्री–पोलिसांचा फार मोठा उपयोग होतो. लोककल्याणकारी राज्यांत स्त्रियांच्या संदर्भात कायदा व सुव्यवस्थेचे अनेक प्रश्न निर्माण होत असतात या कामी स्त्री–पोलिसांचा फार मोठा उपयोग होतो.

भारतात पोलिसांमध्ये महिलांची कमतरता प्रत्यक्षात अखिल भारतीय समस्या आहे. ब्युरो ऑफ पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंटनुसार भारतात केवळ एक लाख 20 हजार महिला पोलिस कर्मचारी आहेत. यापैकी काही राज्यांमध्ये परिस्थिती खूपच वाईट आहे. ज्या स्त्रियांना पोलिसांमध्ये नौकरी मिळते, त्यापैकी बहुतेक महिला कार्य क्षेत्रात ड्यूटी नाही. क्राइम रिकॉर्ड्स ब्यूरो च्या या वर्षाच्या ताज्या अहवालानुसार, भारता मध्ये

2016 मध्ये महिला विरुद्ध गुन्हेगारी 3 लाख 38 हजार घटना घडल्या. याशिवाय बलात्कार के 38, 9 47 केसही पोलिस स्टेशन दाखल केल्या गेल्या आहेत. यावरून स्पष्ट होते की, या प्रकरणात संवेदनशील पद्धतीने ऐकणे आणि पीडिताचे विधान चांगल्या प्रकारे नमुद होणे आवश्यक आहे. या साठी महिला पोलिसकर्मी या उत्कृष्ट कामगीरी बजवत आहेत यात काही शंका नाही.

आज पुणे शहराचा विस्तार वेगाने होत आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या साठ लाखांच्या जवळ पोहोचली आहे. या लोकसंख्येसाठी आता पुण्यात आनेक पोलीस ठाणे झाली आहेत. पण, त्या मानाने व लोकसंख्येच्या तुलनेत पोलीस मनुष्यबळ फारच कमी आहे. त्यामुळे कामाचा वाढलेला ताण, एकूण पोलिसांपैकी निम्मे पोलीस घरापासून वंचित असलेल्या पोलिसांच्या घराची अवस्था बिकट, बारा तासांपेक्षा जास्त कामाचा कालावधी, त्यामुळे निर्माण झालेल्या आरोग्याच्या समस्या आणि कुटुंबाला वेळ न देता येणे, अशा मनस्थितीत सध्या पुण्यातील पोलीस व महिला पोलीस कर्मचारी काम करीत आहेत. त्यामुळे गेल्या काही वर्षांत काही कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्याचे तर काहींना आजारपणामुळे मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

अलीकडे पुण्याचा विकास वेगाने होत असून उपनगरांमध्ये झपाटयाने वाढ झाली आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अनेक गावे नव्याने समाविष्ट झाली आहेत. त्यामुळे पुण्यात नव्याने आठ ते दहा पोलीस ठाणे निर्माण झाली. पण त्या तुलनेत पोलिसांचे संख्याबळ वाढले नाही. त्यामुळे एका–एका पोलीस ठाण्यात फक्त पन्नास ते साठ कर्मचाऱ्यांना काम करावे लागत आहे. साहजिकच त्याचा पोलिसांच्या कामावर ताण येतो. पुण्यात एक हजार नागरिकांमागे एक पोलीस अशी परिस्थिती आहे. आहे त्या मनुष्यबळातच बंदोबस्त, तपास, पोलीस ठाण्याचे काम, न्यायालयाचे काम पाहावे लागते. त्यात सुट्टी मिळत नसल्यामुळे कुटुंबीयांना वेळ देता येत नाही. त्यामुळे आरोग्याकडे लक्ष देण्यास वेळ नसतो. त्यामुळे पोलिसांना आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. याबरोबरच पुणे पोलीस आयुक्तालयात दहा हजार पोलीस अधिकारी कर्मचारी असले तरी फक्त चार हजार चारशे घरे उपलब्ध आहेत. त्यामुळे साडेपाच हजार पोलिसांना घरापासून वंचित राहावे लागत आहे. पुण्यात असलेल्या सहा पोलीस वसाहतीची देखील अवस्था फारच वाईट आहे. त्यातदेखील सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

पोलीस हा जनतेचा मित्र असल्याचे सांगितले जाते, पण जनता आणि पोलीस यांच्यात नेहमीच एक अदृश्य अंतर असते. त्याला कारण, त्याच्या अंगावरची खाकी वर्दी या वर्दीच्या आतला माणूस नेहमीच सामान्यांसाठी गूढ असला, तरी तो माणूसच असतो. त्याला भावना असतात, वेदना असतात, विवंचनाही असतात. कधीतरी त्यातूनच तो वैफल्यग्रस्त होतो, आणि स्वतःचे बरेवाईट करून घेतो. मग त्यांच्यातल्या

माणसाच्या वेदनांचा शोध सुरू होतो. आपल्या मुलाबाळांना चांगले आयुष्य देऊ शकत नाही या विवंचनेत तो कायमच असतो. त्यातूनच तो नैराश्याच्या पायऱ्या चढत जातो आणि शेवटी एका टोकाला जाऊन एकतर आत्महत्या करतो वा या तणावामुळे ग्रासल्याने अतिरक्तदाब, मधुमेह, नैराश्य यामुळे त्याला अकस्मात मृत्यू येतो. त्याच्या पश्चात कोणी त्याच्या कुटुंबीयांची काळजी घेत नाही. सेवा निवासस्थानही सहा महिन्यात रिक्त करावे लागते. वरिष्ठांकडे खेटे टाकूनही त्याच्या कुटुंबीयांना दाद मिळत नाही. भविष्यातील ही आपली स्थिती त्याला सतत पोखरत असते. यातून आपली कधीही सुटका नाही, याचीही त्याला कल्पना असते. आतापर्यंतच्या सरकारचे हेच अपयश आहे. पोलीस दलासाठी नेमके काय हवे आहे, याची जाणीव होऊन प्रत्यक्षात अमलबजावणी होणे गरजेचे आहे.

संशोधन समस्याः—

प्रस्तुत संशोधनात महिला पोलिस शिपाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांच्या अनुषंगाने माहिती संकलीत करताना व माहितीची मांडणी करताना संशोधनात अनेक समस्या येवू शकतात त्यामुळे प्रस्तुत संशोधनात आलेल्या आडचणी दूर कण्यासाठी संशोधन हे काळानूसार बदलेल व लवचिक असेल.

संबंधित साहित्याचा आढावाः—

आज स्त्रियांच्या विविध प्रश्नाविषयी मोठया प्रमाणात संशोधन किंवा अभ्यास सुरू असलेले आढळून येते. स्त्रियांचा अभ्यास करताना त्यांचे समाजातील स्थान आणि भूमिका या अनुषंगाने बऱ्याचदा अभ्यास केला जातो. प्रस्तुत संशोधनात पोलिस क्षेत्रातील स्त्रियांचा अभ्यास त्यांच्या भूमिका आणि त्यातून अद्भवणारे ताण—तणाव लक्षात घेवून केला जाणार आहे.

ज्या महिला पोलिस सेवेत कार्यरत आहेत त्यांचे पोलिस सेवेतील स्थान, त्यांची भूमिका आणि समाजातील स्थान आणि भूमिका यांच्या आधारे महिला पोलिसांचे अध्ययन करणे, तसेच पोलिस प्रशासनातील इतर अधिकारी, त्यांना आलेले अनुभव यांचा मागोवा घेणे. हा हेतू नजरे समोर ठेवून काही ग्रंथ, संबंधित साहित्याचा आढावा या संशोधनात केला जाणार आहे. महिला पोलिस सबलीकरणाच्या वैयक्तिक कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यदृष्टया या पैलूवर जेवढया प्रमाणात संशोधन व्हायला पाहिजे तेवढया प्रमाणात संशोधन झालेले नाही.

अमरजित महाजन यांचा 'इडियन पोलिस विमेन' हा प्रबंध 1982 साली प्रसिद्ध झाला. सदर ग्रंथात भारतिय पोलिस, महिला पोलिसांची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि भारतातील पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश त्याच प्रमाने चंदिगढ येथिल महिला पोलिस यांचा अभ्यास केलेला आहे. 'भारतीय पोलिस' लेखक डॉ.

परिपूर्णानंद आहेत. यांनी ब्रिटिश काळातील तत्कालीन भारतीय पोलिस संरक्षणाचे स्वरूप, कर्तव्य, आणि अधिकार यांचे वर्णन केलेले आहे. 'द पोलिस इन फ्रि इंडिया' या ग्रंथाचे लेखक पी. बी. सिंह यांनी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय पोलिस व्यवस्थेमध्ये झालेले परिवर्तन याचा अभ्यास केला आहे. 'द पोलिस ॲड पॉलिटिकल डेव्हलपमेट इन इंडिया' 1989 या ग्रंथात स्वतंत्र भारतातील राजकीय विकास व समाजात झालेले परिवर्तन आणि विघटन यांचा उल्लेख आढळतो. 'फ्रीडम इज नॉट फ्री' लेखक एस. के घोष यांनी 1975 मध्ये आपल्या ग्रंथात भारतीय पोलिस यांच्या कडून होणारे अमानवीय कृत्य आणि अधिकाराचा होणारा दूरउपयोग याचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात आला आहे. 'द इंडियन पोलिस' लेखक जे. सी. काइ 1932. 'ह्युमन राइट्स ॲड पोलिस' लेखक डॉ. एस. सुब्रमण्यम, 'अमानवीय व्यवहार आणि पोलिस' लेखक जगदिश प्रसाद आर्य, 'स्वांतंर्त्योतर भारतातील पोलिसांची भूमिका आणि जनतेचे दायित्व' या पुस्तकाचे लेखक डॉ. कृष्ण मोहन माथुर, 'पोलिस आणि समाज' या पुस्तकाचे लेखक ए. एल. इराईल व जैन्के वैडाकुंभचेरी.

संशोधनाचे महत्त्वः–

आजपर्यंत पोलीस सेवेतील महिलांच्या प्रश्नांचा विचार फारसा झालेला दिसत नाही. आलिकडच्या काळात पोलीस सेवेतील ताण–तणाव, संघर्ष या संदर्भातील माहिती वेगवेळया प्रसार माध्यमातून पुढे येत आहे. त्यातुन पोलिस व्यवसायातील व्यक्तींच्या जीवनाचा अभ्यास करण्याची जिज्ञासा निर्माण झाली आहे. शासन आणि जणता यांच्यातील एक दुवा म्हणून आपले काम करत असतात. परंतू आज पोलिस "जनतेचे सेवेक नसून राजकार्त्यांच्या तालावर नाचणाऱ्या कठपुतळया आहेत." असे वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे. पोलिस सेवेतील पुरूषांना जर यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत असेल तर महिला पोलिसांच्या समस्या अशाच प्रकारच्या किंवा याहून वेगळया स्वरूपाच्या आहेत का हे जाणून घेण्याची गरज संशोधनाचे महत्त्व स्पष्ट दिसून येते.

बहुतांश समाजात पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे पुरूषांना केंद्रस्थानी ठेवून स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान दिल्याने विविध समस्यांची निर्मिती झालेली दिसते. भारतातील स्त्रि समस्या या पुरातन काळापासून चालत आलेल्या आहेत. या समस्या सोडवण्यांचा प्रयत्न समाजसुधारक, विचारवंत यांनी फार पूर्वीपासून केला आहे. त्यांना त्यामध्ये निःश्चय यश आले आहे. कारण फुले, आंबेडकर, कर्वे, आगरकर या विचांरवतानी स्त्रि शिक्षणाला महत्व देऊन स्त्रियांमध्ये शैक्षणिक जागृती निर्माण करण्याचे बहुमोल कार्य केले आहे. त्यामुळे आज समाजाला शिक्षणाचे महत्व समजले असले तरी त्यात फारसा फरक पडला नाही. स्वातंर्त्यानंतर भारतात स्त्रि चळवळीला चालना मिळाल्यामुळे स्त्रि–पुरूष समानतेचे अनेक कायदे केले गेले. परंतू समाजाची पुरूषप्रधान संस्कृतीची मानसिकता बदलेली नसल्यामुळे महिलांच्या समस्येच्या स्वरूपात बदल झाला आहे. स्वातंत्र्यानंतर

स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला. आज कोणत्याही क्षेत्रात स्त्रि–पुरूष भेद भाव करण्यास भारतीय संविधानाने बंदी घातली आहे

संशोधन संदर्भ चौकट :–

प्रस्तूत संशोधना विषयी सैध्दांतीक मांडणी ही टॉलकॉट पार्सन्स यांच्या संरचनात्मक कार्यात्मक या दृष्टिकोणातुन विचार केला जाणर आहे.

संशोधनाची उदिष्टे :–

1. पुणे जिल्हयातील पोलिस सेवेत भरती होणाऱ्या महिलांची सामाजिक, आर्थिक,पार्श्वभूमी जाणून घेणे.
2. पोलिस सेवेत महिला कर्मचाऱ्याची आवश्यकता जाणून घेणे
3. पोलिस सेवेतील महिलांची भूमिका आणि दर्जा.
4. पोलिस सेवेतील महिलांचे कैटुंबिक समस्या जाणून घेणे.
5. पदोन्नोती आणि बदलीचा महिला पोलिसांच्या कौटूंबिक जिवनावर होणारा परिणाम जानून घेणे.
6. पोलिस सेवेतील महिलांच्या ताण–तणावाचे आकलन करणे.

गृहीतकृत्येः–

संशोधन करण्यामागचा उद्देश स्पष्ट झाल्यानंतर संशोधनाला योग्य दिशा मिळावी यादृष्टीने खालील गृहीतकृत्यांचा आधार घेण्यात आला.

1. महिला पोलिस सेवेत येण्यामागे गरीबी व पोलिस वर्दीचे आकर्षण दिसून येते.
2. लोकसंख्येच्या प्रमाणात महिला पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या कमी दिसून येते.
3. पुरूष पोलिसांपेक्षा महिला पोलिसांवर जोखिमीच्या कामाची जबाबदारी कमी प्रमाणात दिली जाते.
4. पती–पत्नी दोघेही सेवेतच असले तरी परस्परांना समजून घेऊ शकतात असे नाही.
5. महिला पोलीस म्हणून महिलांना समाजात आणि कुटुंबात अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.
6. महिला पोलिस अधिक ताण–तणावामध्ये काम करतात.

संशोधन पद्धतीः–

प्रस्थापित ज्ञानात भर टाकणे किंवा अज्ञात ज्ञानाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे. त्याच प्रमाणे जुन्या तथ्याचे परिक्षण करून त्याची नव्यांनी मांडणी करणे हा संशोधनाचा हेतु असतो. यासाठी संशोधनाच्या विविध

पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. समाजाच्या विशिष्ठ अंगाविषयी वस्तुनिष्ठ माहिती गोळा करण्याच्या उद्देशाने सामाजिक सर्वेक्षण हाती घेतले जाते. ग्रामीण व शहरी असा कोणताही घटक घेवुन महिला पोलिस शिपाई यांच्या अभ्यास विषयातील प्रश्नाशी निगडीत असणाऱ्या बाबीची माहिती मिळविणे हा सामाजिक सर्वेक्षणाचा मूळ हेतु असुन. त्याच अनुषंगाने **'पुणे जिल्हयातील महिला पोलिस शिपाई कर्मचाऱ्यांच्या समस्या एक समाजशास्त्रीय अभ्यास'** जाणुन घेण्याच्या उद्देशांनी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणर आहे.

नमुना पद्धतीः—

सामाजिक संशोधनात नमुना निवड करणे ही एक महत्वाची कामगिरी असते. नमुना निवड करताना समग्राच्या काही भागांची प्रातिनिधिक नमुनना म्हणून निवड केली जाते. आणि निष्कर्श काढले जातात. निवडलेला नमुना हा संशोधन विषयाचे योग्य असे प्रतिनिधित्व करणारा असावा लागतो. ज्या पूर्ण गटातून नमुना निवडलेला असतो, त्याला उद्देशून 'समग्र' ही सज्ञा वापरली जाते. या साठी स्तरित याद्रच्छिक नमुना तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्य संकलनाची साधने :—

तथ्य संकलनासाठी प्राथमिक दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोता मध्ये महिला शिपाई पोलिसांकडून माहिती मिळविण्यासाठी मुलाखत, अनुसूची आणि प्रश्नावली सहभागी निरीक्षण या तंत्राचा वापर करणार आहे. तसेच द्वितीय स्त्रोता मध्ये प्रकाशित व अप्रकाशित संशोधन अहवाल, साहित्य, केंद्र व राज्य शासनाचे अहवाल, रेकॉर्ड वर्तमानपत्र, नियतकालीके, मासिके, सरकारी दप्तरातील माहिती, साप्ताहीक, दैनिक, पाक्षिक, साप्ताहिक, ग्रंथ, पुस्तके या दुय्यम सामग्रीचा उपयोग करून महिती मिळवण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी पुणे जिल्हांतील ग्रामीण 100 व शहरी भागतील 100 महिला पोलीस कमचाऱ्यांची नमूना निवड केली जाणार आहे.

तथ्याचे विश्लेषणः—

मुलाखत अनुसूचि द्वारे जी माहिती संकलीत केली त्याचे वर्गीकरण करण्यासाठी सांकेतीकीकरण करून त्यानंतर कोष्टके, आलेखाद्वारे आलेल्या महितीची मंडणी केली जाणार आहे. संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषन वेगवेगळया प्रकरणातून करण्यात येणार आहे.

प्रकरण मांडणीः–

प्रकरण पहिले – प्रस्तावना

◈ पुणे जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी,पोलिसांचा इतिहास

प्रकरण दुसरे – संबधित साहित्याचा आढावा

◈ प्रस्तावना, संबधीत विषयावरील ग्रंथ

प्रकरण तिसरे – संशोधन पद्धती

◈ संशोधनाचे महत्व, संशोधनाची उदिष्टे, गृहित कृत्ये, नमुना पद्धती, तथ्य संकलनाची साधने,

प्रकरण चौथे – महिला पोलिस शिपाई कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती

◈ कौटुंबिक,सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक.

प्रकरण पाचवे – महिला पोलिस शिपाई कर्मचाऱ्यांची भुमिका व दर्जा

◈ भुमिका पालन, भुमिकेतील अडचन, भुमिकेनुसार व्यवहार

प्रकरण साहवे – महिला पोलिस शिपाई कर्मचाऱ्यांच्या समस्या.

◈ कौटुंबिक,सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक

प्रकरण सातवे – महिला पोलिस शिपाई कर्मचाऱ्यांच्या सेवेतील तान–तणाव.

◈ व्यवसायिक पद, जबाबदारी आणि जाणीव सेवेतील बदलीचा कालावधी.

प्रकरण आठवे – निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भ ग्रंथ

1. द रोल कन्फीक्ट इन वर्किंग वूमन– कलारानी चेतना प्रकाशन.
2. ब. रा. हिवरगावकर, भाषांतराचे पूर्नलेखन 6 अ. भावे कौटिल्य अर्थशास्त्र, वरदा बुक्स पुणे 16.
3. Abudl Fazal Aain-E-Akbari, Trans.Naresh Jain. C New Delhi. 1956.
4. Sarkar. Jadunath. Mughal Admadministration, Bombay 1972.
5. Cox. E.C. Police and Crime in India, New Delhi. 1976.
6. Dhar. Niranjan. Admadministrative System of The East India Company, 1714-1786. Calcutta 1964.
7. Edwardes. S. M. The Bombay City Police. A Historical Sketch, London 1923.
8. Government Centeral Printing Press. Report of The Indian Police Commission, Simila 1903.
9. दै. लोकसत्ता 10 मे 2015.
10. डॉ. एस. अखिलेश. अधुनिक भारत और पोलिस की भूमिका, राधाकृष्णन प्रकाशन नई दिल्ली 2008.
11. डॉ. गुरूनाथ नांडगोंडे. सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन कोल्हापूर. 1986.
12. बोधनकर सुधिर, अलोनि विवेक सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन नागपूर 2003.
13. पु. ल. भांडारकर. सामाजिक संशोधन पद्धती, विद्या बुक औरंगाबाद 1996.

संशोधक
सुमेध सुभाषराव राजुरकर
(एम.ए. समाजशास्त्र, सेट)
ता. उमरगा जि. उस्मानाबाद

मार्गदर्शक
प्रा. डॉ. शाहिनाथ प्रभु घायाळ
(पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग प्रमुख)
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद,
ता. अहमदपूर जि. लातूर